## प्रेस नोट

**दिनांक २५/०४/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### बँकेत हातचलाखीने रुपये ची हेराफेरी चा गुन्हा उघड
### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक २१.१२.२१ चे १८.२८ वा. फिर्यादी नामे— सौ. यशोदा प्रल्हादजी तिघरे वय ४० वर्ष रा. केसलापूर ता. मौदा यांनी पो.स्टे. मौदा येथे रिपोर्ट दिला कि, दिनांक २१.१२.२१ चे १५.१५ वा. ते १५.३० वा. फिर्यादीने स्टेट बॅक ऑफ इंडिया मौदा येथे पैसे काढण्याकरीता गेले असून बॅकेतून ५०,०००/—रु. काढून तिने आपले पती यांना दिले. फिर्यादीचे पती मांडीवर घेवून पैसे मोजित असता एक अज्ञात इसम फिर्यादी जवळ येवून तुमच्या पैसाच्या बंडल मध्ये एक नोट जुनी आहे, त्यावर फिर्यादीने त्याला बंडल मोजन्या करीता दिली असता ते नोट व पैसाच्या बंडल मधून ५००/—रु. ची नोट डुपलीकेट आहे म्हणून काढली व पुन्हा फिर्यादीच्या पतीने पैसे मोजले असता त्या पैसा मध्ये ५००/—रु चे ६४ नोटा एकुण ३२,०००/—रु. होते व त्या मध्ये १८,०००/—रु. हातचालाखीने काडून फिर्यादीची फसवणुक करुन तेथून निघून गेला. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र २३०/२१ कलम ४२० भादवि चा दाखल असुन तपासात होता.

सदर गुन्हयात समांतर तपासा दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयीत ईसम नामे आरोपी नामे— नासिर अली अमीर अली, वय ४० वर्ष, रा. येरखेडा कामठी यास ताब्यात घेऊन गुन्ह्यासंबधने सखोल विचारपूस केली असता. सदर आरोपीने गुन्हा कबूल केले व १८,०००/—रू. ची हेराफेरी केल्याचे कबूल केले. त्याचे अंग झडतीतून एकुण ३,०००/— रुपये गुन्ह्यातील माल जप्ती केला. सदर मुद्देमाल व केलेल्या तपासाचे कागदपत्रे ही पुढील कायदेशीर कार्यवाही करिता पोलीस स्टेशन मौदा यांचे ताब्यात दिले.

**उघडकीस आणलेला गुन्हा :—**

१) पो.स्टे. मौदा अप.क्र. ७३०/२०२१ कलम ४२० भादवी

**गुन्हा जप्त मुद्देमालाचे वर्णन:—**

१) ३०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा.श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि अनिल राउत, पोहवा विनोद काळे, नाना राऊत, नापोशी शैलेश यादव, प्रणय बनाफर, चासफौं साहेबरावं बहाळे यांचे पथकाने केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर